**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 20 मार्च 2018 रोजी भरलेल्या माहे मार्च 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | **इतिवृत्त** - दिनांक 19 जानेवारी 2018 (भाग 1 ते 5). |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 02**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | स्व. आर. आर. पाटील उद्यान से. 19अे नेरूळ व ॲम्युझमेंट पार्क से. 26 कोपरी गांव वाशी येथील उद्यानाचे संवर्धन संरक्षण करणेबाबत निविदा मागविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/उद्यान/211/2018. |
| **ठराव क्र. 278.**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | "स्व. आर. आर. पाटील उद्यान से. 19अे नेरूळ व ॲम्युझमेंट पार्क से. 26 कोपरी गांव वाशी येथील उद्यानाचे संवर्धन संरक्षण करणेबाबत निविदा मागविणेच्या प्रस्तावातील अ)उद्यानात येणाऱ्या नागरिकांकडून प्रवेश शुल्क, वाहन पार्किंग, ॲम्पीथीएटर व स्केटिंग रिंग इत्यादीसाठी शुल्क आकारणेबाबत मा.सर्वसाधारण सभेने स्व.आर.आर.पाटील उद्यान से. 19 अे, नेरूळ येथे दिनांक 20/11/2015 रोजीच्या ठरावाप्रमाणे (ठराव क्र. 748) अम्युझमेंट पार्क से.26 कोपरी गांव वाशी येथील उद्यानात येणाऱ्या नागरिकांकडून शुल्क आकारणेस, ब) सदर उद्यानांचे संवर्धन व संरक्षण (सर्व समावेशक कामे) करणेबाबत निविदा सुचना मागवून देखभाल, दुरूस्ती व इतर कामासाठी स्वतंत्र यंत्रणा/ठेकेदाराची नेमणूक करणेस, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | वाशी सेक्टर 10ए येथील प्रथम संदर्भ रूग्णालय इमारतीचे रंगरंगोटी व सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./363/2018. |
| **ठराव क्र. 279.**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | "वाशी सेक्टर 10ए येथील प्रथम संदर्भ रूग्णालय इमारतीचे रंगरंगोटी व सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 15 लाख, 47 हजार 504 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | तुर्भे से.22 येथील रामतनुमाता मैदान व तलावाच्या परिसरातील हेवी ड्युटी S.W.Drain बांधणे व रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./364/2018. |
| **ठराव क्र. 280.**<br>**दिनांक 20 मार्च 2018** | "तुर्भे से.22 येथील रामतनुमाता मैदान व तलावाच्या परिसरातील हेवी ड्युटी S.W.Drain बांधणे व रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 12 लाख, 09 हजार 313 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 06.** **दिनांक 20 मार्च 2018** | तुर्भे विभागातील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सी ब्लॉक मधील भु.क्र. सी/66 मॅक स्प्रिंग प्रा.लि. ते. भु.क्र.सी/62/1 पर्यंत ड्रेनची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./365/2018. |
| **ठराव क्र. 281.** **दिनांक 20 मार्च 2018** | "तुर्भे विभागातील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सी ब्लॉक मधील भु.क्र. सी/66 मॅक स्प्रिंग प्रा.लि. ते. भु.क्र.सी/62/1 पर्यंत ड्रेनची सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 41 लाख, 42 हजार 160 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 07.** **दिनांक 20 मार्च 2018** | तुर्भे सेक्टर- 19 व 20 येथील अन्नपुर्णा चौक ते पुनित कॉर्नर व फळ मार्केटच्या परिसरातील पदपथाची सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./366/2018. |
| **ठराव क्र. 282.** **दिनांक 20 मार्च 2018** | "तुर्भे सेक्टर- 19 व 20 येथील अन्नपुर्णा चौक ते पुनित कॉर्नर व फळ मार्केटच्या परिसरातील पदपथाची सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 85 लाख, 91 हजार 165 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 08.** **दिनांक 20 मार्च 2018** | तुर्भे विभागातील क्षेपणभूमीलगत टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रापासून ते तुर्भे स्टोअर पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./367/2018. |
| **ठराव क्र. 283.** **दिनांक 20 मार्च 2018** | "तुर्भे विभागातील क्षेपणभूमीलगत टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रापासून ते तुर्भे स्टोअर पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 76 लाख, 72 हजार 206 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 09.** **दिनांक 20 मार्च 2018** | ऐरोली प्र.क्र. 22 से. 8ए येथे अपुर्वा सोसा. ते कामाठी प्लाझा, यश पॅराडाईझ ते गुरूकूल सी.एच.एस. व ईडन पार्क ते गणपती बाप्पा चौक पर्यंत आर.सी.सी. गटर बांधून सुधारणा करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./368/ 2018. |
| **ठराव क्र. 284.** **दिनांक 20 मार्च 2018** | "ऐरोली प्र.क्र. 22 से. 8ए येथे अपुर्वा सोसा. ते कामाठी प्लाझा, यश पॅराडाईझ ते गुरूकूल सी.एच.एस. व ईडन पार्क ते गणपती बाप्पा चौक पर्यंत आर.सी.सी. गटर बांधून सुधारणा करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 55 लाख, 83 हजार 738 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 10.** **दिनांक 20 मार्च 2018** | बेलापूर विभागातील नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदान विकसित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./369/2018. |
| **ठराव क्र. 285.** **दिनांक 20 मार्च 2018** | "बेलापूर विभागातील नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदान विकसित करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 1 कोटी, 01 लाख, 50 हजार 246 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 11. दिनांक 20 मार्च 2018** | नवी मुंबई हद्दीतील कोपरखैरणे येथील कातकरीपाडा आदिवासी घटकांसाठी प्रस्तावित घरकुल योजनाच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 26/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/ श.अ./371/2018. |
| **ठराव क्र. 286. दिनांक 20 मार्च 2018** | "नवी मुंबई हद्दीतील कोपरखैरणे येथील कातकरीपाडा आदिवासी घटकांसाठी प्रस्तावित घरकुल योजनाच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 9 कोटी, 45 लाख, 75 हजार 441 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 12. दिनांक 20 मार्च 2018** | कोपरखैरणे विभागात माता बाल रुग्णालयाकरीता जागा उपलब्ध करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/743/2018. |
| **ठराव क्र. 287. दिनांक 20 मार्च 2018** | कोपरखैरणे विभागात माता बाल रुग्णालयाकरीता जागा उपलब्ध करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/743/2018. |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 13. दिनांक 20 मार्च 2018** | नेरुळ, कुकशेत, सेक्टर-14, येथे भूखंड क्र. पी-11 या ठिकाणी उभारण्यात आलेली व्यायामशाळा ही वास्तु कुकशेत ग्रामस्थ व ग्रामस्थांच्या संस्थांना 05 वर्षे कालावधीकरीता लिव्ह ॲण्ड लायसन्स् तत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता /744/2018. |
| **ठराव क्र. 288. दिनांक 20 मार्च 2018** | "नेरुळ, कुकशेत, सेक्टर-14, येथे भूखंड क्र. पी-11 या ठिकाणी उभारण्यात आलेली व्यायामशाळा ही वास्तु कुकशेत ग्रामस्थ व ग्रामस्थांच्या संस्थांना 05 वर्षे कालावधीकरीता लिव्ह ॲण्ड लायसन्स् तत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेने विकसित केलेली इमारत महानगरपालिकेच्या मालकीची राहील या अटीवर व्यायामशाळा या प्रयोजनासाठी मा.महापालिका सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 1141, दि.15/02/2010 प्रमाणे पायाभूत भाडे ठेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) व (ड) नुसार सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या नोंदणीकृत पुर्नवसित ग्रामस्थ अथवा ग्रामस्थांच्या संस्थांना प्रथमत: 5 वर्षे कालावधीकरीता (प्रत्येक वर्षी करारनामा नुतनीकरण करण्याच्या अटीवर परवानगी व अनुज्ञा (Leave and Licence) तत्वावर देणेकरिता प्रस्ताव मागविण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 14. दिनांक 20 मार्च 2018** | नावाळी (दहिसर) येथील माता बाल रुग्णालयाची जागा जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे वर्ग करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/ मालमत्ता/747/2018. |
| **ठराव क्र. 289. दिनांक 20 मार्च 2018** | "नावाळी (दहिसर) येथील माता बाल रुग्णालयाची जागा जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे वर्ग करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 79(क) नुसार नावाळी (दहिसर) येथील माता बाल रुग्णालयाची इमारत जिल्हा परिषद, ठाणे यांना विनामोबदला हस्तांतरीत करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **नामंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 15.<br>दिनांक 20 मार्च 2018** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरावरील राज्य दरसूची (SSR for year 2017-18) वापरणेच्या आयुक्तांचे दिनांक 09/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./451/2018. |
| **ठराव क्र. 290.<br>दिनांक 20 मार्च 2018** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विषयक विकास कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्यस्तरावरील राज्य दरसूची (SSR for year 2017-18) वापरणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिकेकरिता दरसूची (Current Schedule Rate) लागु करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 16.<br>दिनांक 20 मार्च 2018** | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376, प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसुची ड नुसार समाविष्ट व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/परवाना विभाग/419/2018. |
| **ठराव क्र. 291.<br>दिनांक 20 मार्च 2018** | "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376, प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसुची ड नुसार समाविष्ट व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणेच्या प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे व मा. स्थायी समितीच्या अर्थसंकल्पीय चर्चेत सुचित केल्यानुसार परवाना विभागास दिलेले ध्येय व उद्दीष्ट साध्य करण्याकरीता तक्त्यात नमूद परवानगी / परवानाच्या शुल्क दरवाढीस, **<u>मा.सर्वसाधारण सभेने खालील तक्त्यात शिफारस केल्याप्रमाणे,</u>** प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सूचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |

| अ. क्र. | महानगरपालिकांची नावे | व्यवसायाचे क्षेत्रफळ(चौ.मी.) | प्रस्तावित परवाना शुल्क (रू.) | | | | **मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले परवाना शुल्क (रू.)** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शहर / नोड | | गाव गावठाण झोपटपट्टी | | **शहर / नोड** | | **गाव गावठाण झोपटपट्टी** | |
| | | | किमान | कमाल | किमान | कमाल | **किमान** | **कमाल** | **किमान** | **कमाल** |
| 4 | नवी मुंबई महानगरपालिका (प्रकरण 18 भाग 4 मधील हॉटेल, लॉजिंग/ बोर्डींग, उपहारगृह, स्विटमार्ट इ. व्यवसायांसाठी) | 0 ते 20<br>20 ते 50<br>50 ते 100<br>100 ते 150<br>150 चौ.मी. पेक्षा जास्त प्रत्येक 50 चौ.मी.ला | 750/-<br>1125/-<br>1875/-<br>2625/-<br>750/- | 37500/- | 675/-<br>1013/-<br>1688/-<br>2363/-<br>675/- | 33750/- | **450/-<br>675/-<br>1125/-<br>1575/-<br>450/-** | **22500/-** | **300/-<br>450/-<br>750/-<br>1050/-<br>300/-** | **15000/-** |
| | नवी मुंबई महानगरपालिका (प्रकरण 18 भाग 4 मधील केशकर्तनालय, सलून, स्पा, ब्युटीपार्लर इत्यादी व्यवसायांसाठी) | 0 ते 20<br>20 ते 40<br>40 ते 75<br>75 ते 100<br>100 ते 150<br>150 चौ.मी. पेक्षा जास्त प्रत्येक 50 चौ.मी.ला | 350/-<br>575/-<br>1125/-<br>1400/-<br>2825/-<br>625/- | | 315/-<br>518/-<br>1013/-<br>1260/-<br>2543/-<br>563/- | | **210/-<br>345/-<br>675/-<br>840/-<br>1695/-<br>375/-** | | **140/-<br>230/-<br>450/-<br>560/-<br>1130/-<br>250/-** | |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 17.<br>दिनांक 20 मार्च 2018** | नामकरण करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/ जसं-3/117/2018. |
| **ठराव क्र. 292.<br>दिनांक 20 मार्च 2018** | "प्रभाग क्र. 67, तुर्भे सेक्टर-19 माथाडी भवन पासून सेक्टर-26 कडे जाणाऱ्या रस्त्याचे **"आयएमसी मार्ग"** असे नामकरण देण्यासंबंधातील आयुक्तांच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 18. दिनांक 20 मार्च 2018** | बहुउद्देशिय इमारतीमधील जागा विविध प्रयोजनासाठी भाडेतत्वावर देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/03/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/ 755/2018. |
| **दिनांक 20 मार्च 2018** | "बहुउद्देशीय इमारतीमधील जागा विविध प्रयोजनासाठी भाडेतत्वावर देणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना लग्नकार्य, मुंज, साखरपुडा, विविध कार्यशाळा, मेळावे, सभा, प्रदर्शन (EXhibition) चे बैठक, वाढदिवस इ. प्रयोजनाकरीता किफायतशीर दरामध्ये जागा उपलब्ध करून देणेसाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे बहुउद्देशीय इमारतीचा विनियोग करणेस व त्यासाठी आवश्यक संविदा करण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **अनिर्णित.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**